# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024

# देसाई कॉलेजमध्ये 'आझाद हिंद की गाथा'चे सादरीकरण

शहर प्रतिनिधी

पाटण

भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्यसंचनालय, राष्ट्रीय सेवा योजना आणि आर्टिस्टिक ह्यूमनने आयोजित केलेल्या 'आझाद हिंदची गाथा या नाट्यप्रयोगासाठी महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यामधील ७५ महाविद्यालयांनी ७५ ठिकाणी ७५ नाट्यप्रयोग सादर करण्याचा संकल्प केला आहे. यानुसार पाटण येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाने देखील या उपक्रमामध्ये सहभाग घेतला आहे.



पाटण : नाट्य प्रयोगात सहभागी विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. एस. डी. पवार व इतर.

'आझाद हिंदची गाथा' या नाटकाचा प्रयोग महाविद्यालयाच्या डॉ. अब्दुल कलाम सभागृहात झाला. सदर कार्यक्रमाचा शुभारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार व एनएसएस. कार्यक्रम अधिकारी डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांच्या हस्ते झाला. या नाट्य प्रयोगाचे सादरीकरण महाविद्यालयाच्या डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. या नाट्य सादरीकरण कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. नाट्य प्रयोगाच्या माध्यमातून स्वातंत्र्य सैनिकांचे स्वातंत्र्यसाठीचे योगदान आणि भारतातील सांस्कृतिक विविधता अधोरेखित करण्यात आली आहे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतावर नृत्य देखील केले. डॉ. भरत जाधव यांनी आभार मानले. नाट्यप्रयोगाचे सूत्रसंचालन तनिष्का शिर्के हिने केले.